# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. १३/११/२०१७

## जिल्हा स्तरीय अंतिम फेरी रेला समूह नृत्य सपर्धा-२०१७ उत्साहात संपन्न

गडचिरोली जिल्हा हा आदिवासी बहूल जिल्हा असून आदिवासींची स्वतंत्र अशी संस्कृती येथे नांदत आहे. त्या संस्कृतीला उभारी देण्यासाठी व आदिवासींच्या अंगीकृत असलेल्या विविध कलागुणांना वाव व संधी प्राप्त करुन देण्याकरीता जिल्हा पोलीस विभागामार्फत रेला समूह नृत्याचे आयोजन करण्यात आलेले आहे.

रेला समूह नृत्य स्पर्धेचे प्रथम फेरी पोस्टे, उपपोस्टे व पोमके स्तरावर, व्दितीय फेरी उपविभागीय स्तरावर व काल दिनांक १२/११/२०१७ रोजी शहरातील शिवाजी महाविद्यालयाच्या प्रांगणात जिल्हा स्तरावर अंतिम फेरी घेण्यात आली. यामध्ये प्रत्येक पोलीस उपविभाग स्तरावरुन १ संघ याप्रमाणे एकूण १० संघ सहभागी झाले होते.

आपल्या संस्कृतीचे उत्कृष्ट सादरीकरण करत तसेच रेला नृत्याला एका वेगळया उंचीवर नेत सहभागी सर्व स्पर्धकांनी उपस्थित प्रेक्षकांची दाद मिळवली व आपल्या नृत्यातून आतंकवाद, नक्षलवाद मिटवून आदिवासी समुदयाला संरक्षित करण्याचा संदेश ही दिला.

जिल्हा स्तरावर घेण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक महेंद्र आलामी संघ पेठा एटापल्ली, व्दितीय क्रमांक जय सेवा संघ बंगाराम पेठा जिमलगट्टा व तृतीय क्रमांक बिरसा मुंडा संघ गोरगानगर, लाहेरी, भामरागड यांना मिळाला. विजेत्या प्रथम, व्दितीय व तृतीय संघास अनुक्रमे २५,०००/- रु. २०,०००/-रु. व १५,०००/- रु. रोख पारितोषिक देण्यात आले.

कार्यक्रमाला मा. श्री अशोक नेते, खासदार गडचिरोली- चिमुर लोकसभा क्षेत्र, प्रमूख अतिथी मा. श्री. डॉ. देवराव होळी, आमदार गडचिरोली विधानसथा क्षेत्र तसेच मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख, मा. अपर पोलीस अधिक्षक डॉ. हरी बालाजी, मा. अपर पोलीस अधिक्षक महेंद्र पंडीत हे उपस्थित होते. याचबरोबर मोठया प्रमाणात श्रोतेगणही उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नितेश झाडे यांनी तर प्रास्ताविक उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सागर कवडे यांनी केले.












गडचिरोली पोलीस दल
रेला समुह नृत्य स्पर्धा-२०१७